मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# पालिकेचे अभियंते गिरविणार आयआयटीत पर्यावरणाचे धडे

**महापालिकेतील पाच अभियंते रुरकी आयआयटीमध्ये ज्ञान आत्मसात करणार : जल मंत्रालयाच्या वतीने संस्थेची फी, मासिक भत्ता दिला जाणार आहे**

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महापालिकेतील पाच अभियंते रूरकी आयआयटीमध्ये पर्यावरणाचे सखोल ज्ञान आत्मसात करणार आहेत. त्याकरिता त्यांना दोन वर्षांची विशेष रजादेखील दिली जाणार आहे. तर याकरिता केंद्र सरकारच्या जल मंत्रालयाच्या वतीने संस्थेची फी, वसतीगृह खोलीचे शुल्क, पुस्तक व मासिक भत्ता दिला जाणार आहे.

उत्तराखंड येथे केंद्र सरकारच्या अखत्यारितील रुरकी येथे भारतीय तंत्रज्ञान संस्था आहे. या संस्थेमध्ये एन्व्हायरमेंटल मॅनेजमेंट ऑप रिवर्स ॲण्ड लेक्स हा पर्यावरणाशी संबंधित दोन वर्षे कालावधीचा पदव्युत्तर अभ्यासक्रम चालविला जातो. पर्यावरणाशी संबंधित असलेल्या या विषयाचे अध्ययन करण्यासाठी जास्तीतजास्त अधिकारी, अभियंता व शास्त्रज्ञांना प्रोत्साहित केले जाते. हा अभ्यासक्रम पर्यावरणाशी संबंधित क्षेत्रातील संबंधित समस्यांसाठी मुलभूत तत्वे, आकृती, विश्लेषण आणि उपाययोजनांच्या अंमलबजावणीमध्ये सखोल ज्ञान प्रदान करण्यासाठी तयार करण्यात आले आहेत.




### अशा प्रशिक्षित अभियंत्यांची महापालिकेला गरज

» पिंपरी चिंचवड महापालिका हद्दीतील इंद्रायणी नदीच्या प्रदूषणाचा प्रश्न पालिका प्रशासनासाठी अडचणीचा ठरत आहे. आतापर्यंत कोट्यवधी रुपये खर्च करूनही फेसाळलेली इंद्रायणीनदीमुळे पालिका प्रशासन कायम टिकेचे धनी बनत आहे. त्यामुळे पर्यावरणाशी संबंधित विषयाचे सखोल ज्ञान इंद्रायणीचे प्रदूषण कमी करण्यासाठी उपयुक्त ठरू शकेल. त्यामुळे महापालिका प्रशासनानेदेखील ही बाब मनावर घेत, येत्या 6 ऑगस्टपर्यंत इच्छूक अभियंयांनी नावे नोंदविण्याचे पत्रक काढले आहे.

### या क्षेत्रात योगदान देऊ शकतील

» या अभ्यासक्रमात शिकविल्या जाणाऱ्या अभ्यासक्रमामुळे नॅशनल मिशन फॉर क्लिन गंगा, राष्ट्रीय नदी संवर्धन योजनासारख्या राष्ट्रीय योजना नॅशनल प्लॅन फॉर कन्झर्वेशन ऑफ एक्वाटिक सिस्टीम, अटल मिशन फॉर रिझर्वेशन आणि शहरी परिवर्तन जलशक्ती मंत्रालय, पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्रालय, शहरी विकास मंत्रालयाने हाती घेतलेले घनकचरा व्यवस्थापन, स्वच्छ आणि उन्नत भारत अभियान आदी राज्य सरकार व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या वतीने चालविल्या जाणाऱ्या उपक्रमांमध्ये योगदान देऊ शकणार आहेत.

### अभ्यासक्रमाची रचना

» नद्या आणि तलावांच्या संदर्भात जलस्त्रोतांचे व्यवस्थापन, नद्या आणि तलावांचे पर्यावरण व्यवस्थापन या विषयातील पदव्युत्तर पदवी असलेले उमेदवार शहरी स्थानिक स्वराज्य संस्था, सार्वजनिक आरोग्य विभाग, राज्य पाटबंधारे विभाग, नगरपालिका संस्था, पाणलोट, प्रदूषण नियंत्रण मंडळे, सरोवर विकास प्राधिकरणे यांसारख्या केंद्र आणि राज्य सरकारच्या संस्थांच्या आकांक्षा पूर्ण करण्याची या अभ्यासक्रमाची रचना करण्यात आलेली आहे.

# पिंपरी-चिंचवड शहरात ऑनलाइन चॉइस नंबर प्रक्रियेतील अडथळे दूर

**कागदोपत्री किचकट प्रक्रिया आणि आरटीओचे हेलपाटे यासाठी वाहनधारक पुढे येत नव्हते, गेल्या आठवड्यात 232 वाहनचालकांनी भरले ऑनलाइन पैसे**

**पिंपरी | प्रतिनिधी**

मोटार वाहनासोबत चॉइस नंबर असावा, अशी प्रत्येकाचीच इच्छा असते. मात्र, कागदोपत्री किचकट प्रक्रिया आणि आरटीओचे हेलपाटे यासाठी वाहनधारक पुढे येत नव्हते. आता ही सेवा ऑनलाइन सुरू करण्याचा पहिला प्रयोग पिंपरी-चिंचवडमध्ये सुरू करण्यात आला. गेल्या आठ दिवसांत वाहनधारकांनी याचा वापर मोठ्या प्रमाणात केला आहे. आत्तापर्यंत जवळपास २३२ वाहनधारकांनी ऑनलाइन चॉइस नंबर सेवा वापरली असून या माध्यमातून तब्बल २० लाख रुपये आरटीओ तिजोरीत जमा झाले आहेत. अगदी सोपी आणि सुलभ प्रक्रिया असल्याने याचा जास्तीत जास्त वापर करावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

थोडीशा किचकट प्रक्रियेमुळे अनेक वाहनधारकांनी चॉइस नंबर हवा असूनही त्यांनी घेतला नाही. दुसरीकडे, डीडीसाठी देखील नागरिकांना मोठी धावपळ लागत होती. वेळेमध्ये सर्व कागदपत्रे दाखल न झाल्यास तो क्रमांक इतर वाहनांना जाण्याची भीती देखील होती. मात्र आता ऑनलाइनच्या माध्यमातून ही सुविधा सुरू केल्याने मोठ्या प्रमाणात याचा वापर होत आहे.

दरम्यान, वेगवेगळ्या नंबरसाठी यापूर्वी डीडी भरावे लागत होते. त्यामुळे त्यासाठी वारंवार हेलपाटे मारण्याशिवाय पर्याय नव्हता. त्याचप्रमाणे ऐनवेळी डीडी उपलब्ध न झाल्याने संबंधित अर्जदारांची गैरसोय होत होती. त्यामुळे तयार डीडी साठी काही खासगी व्यक्ती आणि एजंट कडून जादा रक्कम आकारली जात होती. मात्र आता यासाठी नागरिकांची फसवणूक होणार नाही. पिंपरी-चिंचवड शहरात प्रादेशिक परिवहन अधिकारी संदेश चव्हाण यांनी प्रायोगिक तत्त्वावर ही योजना पिंपरी-चिंचवडमध्ये सुरू केली. प्रथमता यामध्ये त्रुटी असल्याने आणि ऑनलाइन पेमेंट होत नसल्याने याबाबत वाहनधारकांनी नाराजी व्यक्त केली होती.



### चॉइस नंबरच्या माध्यमातून लाखो रुपयांचा महसूल

» पुण्यासह पिंपरी-चिंचवड शहरात चॉइस नंबरच्या माध्यमातून लाखो रुपयांचा महसूल दिवसाकाठी मिळतो. यापूर्वी चॉइस नंबरसाठी संबंधित वाहनधारकांना आरटीओमध्ये येणे अनिवार्य होते. कारण, त्यासंबंधीची रक्कम डीडीच्या माध्यमातून आरटीओ जमा करावी लागत होती. त्यामुळे त्यासंबंधीची सर्व कागदपत्रे आणि डीडी काढून तो जमा करावा लागत होता.

### 232 नागरिकांचे चॉईस क्रमांकासाठी अर्ज

» त्रुटी दूर करण्यात आल्या आहेत. त्यामुळे त्याचा वापर करणे सोपे झाले आहे. आत्तापर्यंत २३२ नागरिकांनी चॉईस क्रमांकासाठी अर्ज केले आहेत. तर, या माध्यमातून एकाच वेळी वीस लाख रुपये तिजोरीत जमा झाले आहे.

# पूरस्थिती का निर्माण झाली? कारणे शोधण्यासाठी समिती

## मागील आठवड्यात शहरात निर्माण झालेल्या पूरपरिस्थितीचा अभ्यास करण्यासाठी पुणे महापालिकेने तीन सदस्यीय समिती स्थापन केली

**पुणे | प्रतिनिधी**

मागील आठवड्यात शहरात निर्माण झालेल्या पूरपरिस्थितीचा अभ्यास करण्यासाठी पुणे महापालिकेने तीन सदस्यीय समिती स्थापन केली आहे.

खडकवासला धरणातून पाण्याचा विसर्ग केल्यानंतर सिंहगड रस्ता परिसरासह शहरात पूरपरिस्थिती निर्माण झाली होती. नदीचे पाणी नागरिकांच्या घरात शिरले, नागरिकांचे संसार पाण्यात वाहून गेले. या परिस्थितीला नदीपात्रात टाकण्यात आलेला राडारोडा तसेच नदीसुधार प्रकल्पाचे काम जबाबदार असल्याचा आरोप केला जात आहे. तसेच दररोज नवनवीन कारणे पुढे आणली जात आहे. त्यामुळे पूरपरिस्थितीचे नेमके कारण शोधून काढण्यासाठी महापालिकेने ती सदस्यांची समिती नेमली आहे. या समितीने सात दिवसात अहवाल सादर केल्यानंतर पूरग्रस्त भागात कायमस्वरूपी उपाययोजना केल्या जाणार आहेत, असे अतिरिक्त आयुक्त पृथ्वीराज बी पी यांनी सांगितले.

घाटमाथ्यावर पावसाने दमदार हजेरी लावल्याने खडकवासला धरणक्षेत्रात मोठ्या प्रमाणात पाण्याच्या साठा वाढला. त्यामुळे धरणातून विसर्ग सोडण्यात आला. धरणातून पाणी सोडल्यानंतर सिंहगड रस्ता परिसरासह इतर भागात पूरपरिस्थिती निर्माण झाली होती. पुण्यात पूरपरिस्थिती झाल्याने राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. पूरपरिस्थितीची वेगवेगळी कारणे सांगितली जात आहेत. त्यामुळे महापालिका प्रशासन गोंधळले असून त्यावर उपाययोजना सुचवल्या जात आहेत.

पूरपरिस्थिती निर्माण होण्यामागे मूळ कारण नेमके काय आहे, हे शोधण्याचे काम महापालिकेने हाती घेतली आहे. त्यानुसार बांधकाम, ड्रेनेज आणि पथ विभागाकडून प्रत्येकी एक सदस्य असे मिळून तीन सदस्यीय समिती नेमली जाणार आहे. समिती नेमण्याचे आदेशदेखील काढण्यात आले असून समितीला सात दिवसात अहवाल सादर करावा लागणार आहे. तसेच या समितीमध्ये जलसंपदा विभागाचा एक निमंत्रित सदस्य देखील असणार आहे.



### महापालिकेच्या कर्मचाऱ्यांचे कौतुक

» सिंहगड रस्ता परिसरातील एकतानगरी तसेच इतर भागात पूरपरिस्थिती निर्माण झाल्यानंतर महापालिकेच्या मदत पथकाकडून स्वच्छता मोहीम राबविली जात आहे. महापालिकेच्या अधिकाऱ्यांकडून काम होत नसल्याचे दिसून आल्यानंतर आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले यांनी सिंहगड क्षेत्रीय कार्यालयाचे साहाय्यक आयुक्त संदीप खलाटे यांच्यावर निलंबनाची कारवाई केली. त्यामुळे चांगलीच खळबळ उडाली होती. मात्र खलाटे यांच्यासह पालिकेच्या कर्मचाऱ्यांनी पुराच्या पाण्यात उतरून नागरिकांना मदत कार्य पोहचविले. तसेच पूरपरिस्थितीनंतर परिसरात स्वच्छता मोहीम राबून नागरिकांना मोठा दिलासा दिला. यावेळी नागरिकांची स्वच्छतागृहेदेखील कर्मचाऱ्यांनी साफ करून दिली आहेत. तसेच परिसर स्वच्छ करून दिल्याने नागरिकांकडून महापालिकेच्या कर्मचाऱ्यांचे कौतुक केले जाऊ लागले आहे.

> सिंहगड रस्ता परिसरासह शहरात पूरपरिस्थिती निर्माण झाली. या पूरपरिस्थितीला नदीतील राडारोडा तसेच इतर कारणे सांगितली जात आहेत. मात्र या भागात कायमस्वरूपी उपाययोजना करण्यासाठी पुराचे मूळ कारण शोधले जाणार आहे. त्यासाठी पथ, ड्रेनेज आणि बांधकाम विभाग अशा तीन विभागातील प्रत्येकी एक अधिकाऱ्याची मिळून तीन सदस्यीय समिती नेमली जाणार आहे. जलसंपदा विभागाचा एक आमंत्रित सदस्य असणार आहे. पूरग्रस्त भागात पालिकेच्या कर्मचाऱ्यांकडून चांगले मदतकार्य होत आहे. त्याचे नागरिकांकडून कौतुक केले जात आहे.
>
> **- पृथ्वीराज बी पी, अतिरिक्त आयुक्त, पुणे महापालिका.**

> सिंहगड रस्ता परिसरात पूरपरिस्थिती निर्माण झाल्यानंतर महापालिकेचे अधिकारी, कर्मचारी नागरिकांच्या मदतीसाठी धावले. त्यानंतर परिसरात स्वच्छता मोहीम उत्तमप्रकारे राबविण्यात आली आहे. या परिसरात दरवर्षी पाणी शिरत असते. त्यावर महापालिकेने कायमस्वरूपी उपाययोजना कराव्यात. क्षेत्रीय कार्यालयाचे साहाय्यक आयुक्त खलाटे हे चांगले अधिकारी आहेत. त्यामुळे त्यांचे निलंबन मागे घ्यावे, अशी मागणी आयुक्तांकडे केली आहे.
>
> **- अविनाश निमसे, स्वच्छता राजदूत, सामाजिक कार्यकर्ते.**

# कर्वेनगर ते शिवणे, म्हात्रे पूल ते राजाराम पुलादरम्यान मुठा नदीपात्रात भराव

## मुठा नदीपात्राच्या हरित पट्ट्यात भराव टाकून सुमारे चार ते पाच एकरहून भूखंड निर्माण केल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे

**पुणे | प्रतिनिधी**

कर्वेनगर ते शिवणे, म्हात्रे पूल ते राजाराम पुलादरम्यान मुठा नदीपात्राच्या हरित पट्ट्यात भराव टाकून सुमारे चार ते पाच एकरहून भूखंड निर्माण केल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. हा सर्व प्रकार महापालिकेच्या नाकावर टिच्चून केला जात असल्यामुळे एवढ्या दिवस अधिकारी झोपले होते का, असा संतापजनक सवाल आता पुणेकरांनी उपस्थित केला आहे.

घाटमाथ्यावर पावसाने दमदार हजेरी लावल्याने खडकवासला धरणक्षेत्रात मोठ्या प्रमाणात पाणीसाठा वाढला. त्यामुळे धरणातून पाणी सोडण्यात आले. धरणातून लक्षणीय प्रमाणात पाणी सोडल्यानंतर सिंहगड परिसरासह इतर भागात पूरजन्य परिस्थिती निर्माण झाली होती. यामुळे नागरिकांना चांगलाच त्रास सहन करावा लागला. या पुरात अनेकांचे संसार वाहून गेले, तर काहींना जीव गमवावा लागला. पुण्यात पूरजन्य परिस्थिती नदीपात्रात टाकलेल्या राडारोड्यामुळेच झाली असे आता बोलले जात आहे.

पूरजन्य परिस्थिती पुन्हा निर्माण होऊ नये, यासाठी महापालिकेची यंत्रणा कामाला लागला आहे. कर्वेनगर ते शिवणे या भागातील नदीपात्राची पाहणी केली असता सुमारे चार ते पाच एकर एवढ्या प्रमाणात मोकळी जागा निर्माण केल्याचे प्रशासनाकडून सांगितले जात आहे. परंतु प्रत्यक्षात ही जागा १५ ते २० एकर असल्याचे बोलले जात आहे. या भरावामुळे नदीने तिचे पात्र सोडल्याने सिंहगड परिसरात पाणी शिरल्याचा आरोप केला जात आहे. त्यामुळे हा भराव काढून घेण्याचे काम महापालिकेकडून युध्दपातळीवर सुरू करण्यात आले आहे. सोमवारी (दि. २९) दिवसभरात २०० ट्रक राडारोडा काढून घेतल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले आहे. नागरिकांचे जीव गेल्यानंतर महापालिकेला नदीपात्रात भराव दिसला का, असा प्रश्न नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.



### नदीपात्रातील बांधकामे नियमित करता येणार नाही...

» नदीपात्रातील जागा ही व्यवसायासाठी वापरता येत नाही. मात्र त्यानंतरही मोठ्या प्रमाणात बांधकाम करून व्यवसाय करण्यात येत होते. महापालिकेने अनेक वेळा त्यांना नोटीस दिल्या होत्या. मात्र जागामालकांनी त्यावर काहीच कृती केली नव्हती. तसेच संबंधित बांधकाम नियमित करण्याबाबत महापालिकेकडे अर्जदेखील केला नव्हता. अर्ज केला असता, तरी येथील बांधकाम नियमित करण्यासारखे नव्हते. हा मुद्दा महापालिकेच्या वतीने न्यायालयात मांडण्यात आला. त्यावर न्यायालयाने बांधकाम नियमित करता येणार नसल्याचे निरीक्षण नोंदवले. त्यानंतर महापालिकेच्या बांधकाम विभागाने सोमवार सकाळपासून कारवाईचे सत्र सुरू केले.

> नदीपात्रात भराव टाकून मोकळा भूखंड निर्माण केल्याचे समोर आले आहे. हा राडारोडा काढण्याचे काम महापालिकेकडून केले जात आहे. राडारोडा टाकणाऱ्यांना महापालिकेने नोटिसा दिल्या आहेत. एमआरटीपी कायद्याच्या कलम ५२ नुसार संबंधितांवर कारवाई केली जाणार आहे. नदीसुधार प्रकल्पामुळे पाण्याचा फुगवटा झाल्याचे बोलले जात आहे. या प्रकल्पाला सर्व विभागाच्या परवानग्या आहेत. मात्र त्यानंतरही संबंधित विभागाचा पुन्हा अभिप्राय घेतला जाईल.
>
> **-डॉ. राजेंद्र भोसले,आयुक्त, पुणे महापालिका.**

# स्कूलबस अपघातानंतरही आरटीओ प्रशासन निद्रिस्त

## शहरात अजूनही धावतात शेकडो अनफिट बस : तपासणीची गती वाढणार तरी कधी?

**पिंपरी | प्रतिनिधी**

शहरात अलीकडे शेकडो खासगी शाळा उदयास आलेल्या आहेत. शाळेतून ये-जा करणाऱ्या स्कूलबस, वाहनांची संख्या त्या पटीने वाढत आहे. त्यातच महिनाभरात तब्बल दोन वेगवेगळ्या ठिकाणी स्कूलबस अपघातामुळे पालकांच्या चिंतेत अधिकची भर पडली आहे. दरम्यान, स्कूल बसवर अंकुश ठेवणारे पिंपरी-चिंचवड प्रादेशिक परिवहन विभाग अजूनही निद्रिस्त असल्याचे स्पष्ट झाले आहे. पिंपरी-चिंचवड शहराप्रमाणेच ग्रामीण भागातदेखील मोठ्या प्रमाणात हा विषय गंभीर होत चालला आहे. आरटीओच्या दुर्लक्षामुळे शहरात अद्यापि १ हजारपेक्षा अधिक अनफिट बसेस धावत आहेत. त्या चालकांनी अद्याप फिटनेस चाचणी पूर्ण केलली नाही.




आळंदी- चऱ्होली रस्त्यावर असलेल्या पुलावर जुलै महिन्याच्या पहिल्या आठवड्यातच स्कूल बस आदळली होती. या बसमध्ये ७० हून अधिक विद्यार्थी होते. या घटनेनंतर प्रत्यक्षात आरटीओ प्रशासनाकडून स्कूलबस तपासणी मोहीम तीव्र करण्यात आली होती. मात्र, ही घटना ताजी असतानाच सोमवारी (२९ जुलै) चिंचवड स्टेशन येथील ऑटो क्लस्टरसमोर पुन्हा स्कूलबसचा अपघात झाला. या अपघातात दोन विद्यार्थी जखमी झाले आहेत. बसमध्ये तब्बल १५ विद्यार्थी होते. नागरिकांच्या मदतीने विद्यार्थ्यांना बाहेर काढण्यात आले. मात्र, या अपघातामुळे पुन्हा एकदा स्कूलबस सुरक्षितेचा मुद्दा ऐरणीवर आलेला आहे.

पिंपरी-चिंचवड प्रादेशिक परिवहन कार्यालयअंतर्गत २ हजार ९५१ स्कूल बसची नोंद आहे. जुलै महिन्यामध्ये आळंदी येथे अपघातानंतर आरटीओने पिंपरी-चिंचवड शहर ग्रामीण भागात देखील तपासणी मोहीम सुरू केली होती. मात्र, थोड्या दिवसांनी त्याची गती कमी झाली. चिंचवड येथे अपघात घडूनही त्याची माहिती घेण्याची तसदी आरटीओकडून घेण्यात आली नव्हती. मात्र, येथून पुढे स्कूलबसची वेळोवेळी तपासणी करण्यात येईल, असे सांगितले. विद्यार्थ्यांची वाहतूक करणाऱ्या स्कूलबसची प्रवासी क्षमता दीडपट असते. त्याहून अधिक मुलांना बसवून दाटीवाटीतून ने-आण करण्यात येते. दुसरीकडे, अनफिट स्कूलवर आरटीओचे वायुवेग पथक आणखी सक्रिय करणे गरजेचे आहे . तसेच, प्रत्येक बसचालकाने राज्य शासनाने जारी केलेल्या सन २०११ मधील बस नियमावलीचे तंतोतंत पालन करणे आवश्यक असल्याचे आरटीओने स्पष्ट केले. दरम्यान, आरटीओच्या वतीने फिटनेस संपलेल्या स्कूल वाहनधारकांना नोटिसा देऊन फिटनेस पूर्ण करण्याच्या सूचना केल्या आहेत. अन्यथा त्यावर ती कारवाई करण्यात येईल. दरम्यान सद्यस्थितीत १ हजार २५ वाहनांनी फिटनेस पूर्ण केली नाही. त्यामुळे यापैकी अनेक वाहने रस्त्यावरती निर्धास्तपणे धावत आहेत.

### ..तर वाहनाची तपासणी होणार

**» अपघातानंतर स्थानिक पोलिसांकडून यावरती कारवाई करण्यात आली आहे. त्यामुळे पोलिसांनी स्कूल बसचालकाकडील आवश्यकता कागदपत्रे तपासली असतील. त्याबाबत अद्याप आरटीओला कळवण्यात आले नाही. तर, पोलिसांकडून त्याबाबत पत्र मिळाल्यास संबंधित स्कूलबस वाहनाची तपासणी केली जाणार आहे, असे आरटीओ अधिकाऱ्याने सांगितले.**

> शालेय बसची तपासणी सुरू आहे. येत्या काळात ती आणखी तीव्र करण्यात येणार आहे. तशा सूचना निरीक्षकांना दिल्या आहेत. बसचालकांनी नियमांचे पालन करावे.
> **- राहुल जाधव, उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, पिंपरी-चिंचवड.**

# महावितरणचे खड्डे अन् नागरिकांच्या जिवाशी खेळ

## खड्ड्यात आदळून दोन दुचाकीचालक जखमी : अपघातानंतरही महावितरणचे दुर्लक्ष, अखेर नागरिकांनीच बुजवला खड्डा

**पिंपरी | प्रतिनिधी**

ऐन पावसाळ्यात पिंपरी-चिंचवड शहरात विविध कामांसाठी खड्डे खोदणे सुरूच आहे. चिंचवडगाव, रावेत, थेरगाव या विविध ठिकाणी खड्डे खोदले आहेत. चिंचवडेनगर येथे महावितरणने खोदलेल्या एका खड्ड्यात आदळून दोघे दुचाकीचालक गंभीर जखमी झाले. दरम्यान, यानंतर स्थानिक नागरिकांनी अशा कारभारावर तीव्र संताप व्यक्त केला. महावितरणशी संपर्क साधूनही प्रतिसाद न मिळाल्याने नागरिकांनी रात्रीच तो खड्डा बुजून टाकला. तसेच, दुसऱ्या दिवशी कामासाठी आलेल्या महावितरण कर्मचाऱ्यांना खडेबोल सुनावले.



गेल्या आठवडाभरापासून सुरू असलेल्या संततधार पावसामुळे शहरात बऱ्याच ठिकाणी वीज पुरवठा वारंवार खंडित होत आहे. या विरोधात स्थानिक रहिवाशांनी महावितरणच्या विरोधात संताप व्यक्त केला आहे. त्यातच आता महावितरणकडून मोठी चूक झाल्याने दोन नागरिक जखमी झाले आहेत.

वीज वाहिनीच्या कामासाठी चिंचवडेनगर येथील गुरुमैया शाळेसमोर खड्डा खोदण्यात आलेला आहे. मात्र त्यासाठी कोणतीही सुरक्षा पाळली गेलेली नाही. रावेत किवले विद्युत वाहिनी पावसाळ्यामध्ये खोदकाम सुरू आहे. या खोदकामाची माती रस्त्यावरच टाकण्यात आलेली आहे. त्याचप्रमाणे येथे कोणत्याही प्रकारचा बोर्ड नसल्याने रहिवाशांना हे लक्षात येत नाही.

दरम्यान, मध्यरात्री काम झाल्यानंतर खोदकाम केलेल्या ठिकाणी कोणत्याही प्रकारची सुरक्षा न ठेवता कर्मचारी निघून गेले. या ठिकाणी अंधार आणि अरुंद रस्ता यामुळे हा खड्डा धोकादायक होता. स्थानिक नागरिकांना त्याची कल्पना होती. मात्र, कर्मचारी निघून गेल्यानंतर लगेचच या खड्ड्यामध्ये दोन दुचाकी आदळल्या. जवळपास ३ फूट खोल असल्याने चालकांना मार बसला. या घटनेनंतर स्थानिक नागरिकांनी या ठिकाणी गर्दी केली. अपघातग्रस्त वाहने बाजूला करण्यात आली. यावेळी महावितरण अधिकारी व कर्मचाऱ्यांशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला. मात्र त्यांच्याकडून कोणताही प्रतिसाद न आल्याने नागरिकांनी रोष व्यक्त केला. अखेर नागरिकांनी एकत्र येऊन हा खड्डा बुजवण्याचा निर्णय घेतला. रात्रीच्या अंधारात आणि भर पावसात स्थानिक नागरिकांनी खड्डा बुजवून टाकला. तसेच, दुसऱ्या दिवशी आलेल्या महावितरणच्या अधिकाऱ्यांना घेरले आणि त्यांच्या निष्काळजीपणाबद्दल तीव्र नाराजी व्यक्त केली.

महावितरण कंपनीकडून पावसाळापूर्व उपाययोजना, दुरुस्ती करण्याची गरज असताना त्या बाबीकडे दुर्लक्ष करण्यात येत असल्याचे यातून दिसून येते. वीजपुरवठा खंडित झाल्यानंतर आपल्या वेळेनुसार सवडीनुसार दुरुस्तीसाठी कर्मचारी येतात. कोणता कर्मचारी कोणत्या कशासाठी काम करतो, हे देखील नागरिकांना माहिती नाही. तसेच कर्मचारी फोनदेखील उचलत नसल्याच्या तक्रारी नागरिकांनी व्यक्त केल्या.


# कैद्यांच्या वेतनात पाचपट वाढीचा प्रस्ताव

## कुशल, अर्धकुशल आणि अकुशल कैद्यांना किमान वेतनाप्रमाणे मोबदला देण्याची कारागृह प्रशासनाची राज्य सरकारकडे मागणी

**पुणे | प्रतिनिधी**

वेगवेगळ्या गुन्ह्यांमध्ये दोषी आढळल्यामुळे राज्यातील कारागृहांत शिक्षा भोगत असलेल्या कुशल, अर्धकुशल आणि अकुशल कैद्यांना किमान वेतनाप्रमाणे त्यांच्या कामाचा मोबदला देण्यात यावा, अशी मागणी कारागृह प्रशासनाने राज्य सरकारकडे केली आहे.

राज्याच्या विविध कारागृहातील कारखान्यांमध्ये 'सुधारणा आणि पुनर्वसन' कार्यक्रमांतर्गत कैद्यांना विविध उद्योगात गुंतवून ठेवले जाते. यामध्ये हातमाग, यंत्रमाग, सुतारकाम, चर्मकला, लोहारकाम आदींचा समावेश आहे. कारागृहातील रोजगारांशी सुसंगत किमान वेतनदरासाठी कुशल, अर्धकुशल व अकुशल अशी सरासरी निश्चित करण्यात आली आहे. त्यानुसार कुशल कैद्यांसाठी प्रतिदिन ३२२ रुपये, अर्धकुशल कैद्यांसाठी प्रतिदिन ३०२ रुपये आणि अकुशल कैद्यांसाठी प्रतिदिन २८८ रुपये वेतनवाढ करण्याची मागणी कारागृह प्रशासनाने केली आहे.



कारागृहात शिक्षा भोगणाऱ्या बंद्यांमध्ये सुधारणा व्हावी, त्यांचे पुनर्वसन व्हावे यासाठी सातत्याने विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. कारागृहात विविध उद्योग आहेत. शिक्षा भोगून बाहेर पडणाऱ्या बंद्यांचे पुनर्वसन करण्यासाठी विविध रोजगार विषयक प्रशिक्षण दिले जाते. विविध उद्योगात काम करणाऱ्या कैद्यांना वेतन दिले जाते. सध्या कुशल बंद्यांना ६७ रुपये, अर्धकुशल ६१ तर अकुशल बंद्यांना ४८ रुपये प्रतिदिन वेतन दिले जाते. यात चार ते साडेपाचपट वाढ करण्यात यावी, असा प्रस्ताव कारागृह प्रशासनाने राज्य सरकारकडे पाठवला आहे.

### खुल्या कारागृहातील कैद्यांना वेतनवाढीचा प्रस्ताव नाही...

राज्यात नऊ खुली कारागृहे आहेत. या कारागृहात शेकडो कैदी शेती कामासह कँटिन चालवितात. काहीजण वॉशिंग मशिन, तर काहीजण सलून आणि इस्त्री विभागामध्ये काम करतात. काहीजण सुंदर अशी पैठणी साडी सुद्धा हातमागावर तयार करतात. त्यांनादेखील कमी वेतन मिळते. असे असूनही त्यांच्या वेतनवाढीचा प्रस्ताव कारागृह प्रशासनाने राज्य सरकारकडे पाठवलेला नाही. याबाबत आश्चर्य व्यक्त केले जात आहे.

### राज्यातील 60 पैकी नऊ मध्यवर्ती कारागृहांत उद्योग

» राज्यातील ६० कारागृहांपैकी नऊ मध्यवर्ती कारागृहे, नऊ खुली कारागृहे, एक महिला कारागृहात कैद्यांनी विविध उद्योगात गुंतवून ठेवले आहेत. यामध्ये येरवडा, नाशिक, नागपूर कारागृहाच्या कारखान्यात हातमाग, यंत्रमाग, सुतारकाम, चर्मकला, लोहारकाम, बेकरी, रसायन उद्योग सुरू आहेत. या माध्यमातून एक ते दीड दशकापूर्वी कैदी कोटीच्या कोटी रुपयांचे उत्पन्न घेत होते. त्यावेळी कारखान्यात काम करणाऱ्या सिद्धदोष पुरुष कैद्यांची संख्या सत्तर टक्के होती. आता मात्र हीच संख्या तीन ते चाळीस टक्क्यांपर्यंत आली आहे.

"कारागृहातील रोजगारांशी सुसंगत किमान वेतनवाढीसाठी कुशल, अर्धकुशल आणि अकुशल अशी सरासरी निश्चित करण्यात आली आहे. त्यानुसार कुशल कैद्यांसाठी प्रतिदिन ३२२ रुपये, अर्धकुशल बंदिवानांसाठी प्रतिदिन ३०२ तर अकुश बंदिसानांसाठी प्रतिदिन २८८ रुपये अशी वेतनवाढ करण्याची शिफारस करून तत्कालीन अपर पोलीस महासंचालक आणि कारागृह महानिरीक्षक अमिताभ गुप्ता यांनी राज्य सरकारकडे प्रस्ताव पाठविला आहे.

- डॉ. जालिंदर सुपेकर, विशेष पोलीस महानिरीक्षक, कारागृह आणि सुधार सेवा

# आरटीई प्रवेशप्रक्रियेत पुन्हा नवी अडचण

## कुशल, अर्धकुशल आणि अकुशल कैद्यांना किमान वेतनाप्रमाणे मोबदला देण्याची कारागृह प्रशासनाची राज्य सरकारकडे मागणी

**पुणे | प्रतिनिधी**

शिक्षण हक्क कायद्यांतर्गत (आरटीई) २५ टक्के राखीव जागांसाठी प्रवेश प्रक्रिया राबवण्याचा आदेश उच्च न्यायालयाने दिला आहे. मात्र, केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाची (सीबीएसई) वाढीव जागांना परवानगी घ्यावी लागेल, शाळेच्या पूर्वपरवानगीशिवाय आरटीई संकेतस्थळावर शाळेला परस्पर जोडून घेण्यात आले अशी कारणे देत काही खासगी शाळांकडून प्रवेश देण्यास नकार देण्यात येत आहेत. त्यामुळे आधीच विलंब झालेल्या आरटीई प्रवेशप्रक्रियेत पुन्हा नवी अडचण निर्माण होत आहे.

वंचित घटक, सामाजिक आणि आर्थिक दुर्बल घटकांतील विद्यार्थ्यांना आरटीईअंतर्गत २५ टक्के राखीव जागांवर खासगी शाळांमध्ये प्रवेश दिला जातो. यंदा शिक्षण विभागाने आरटीई प्रवेशांच्या नियमांत बदल केल्यामुळे गोंधळ निर्माण झाला. परिणामी न्यायालयात याचिका दाखल होऊन प्रवेशप्रक्रिया ठप्प झाली होती. त्यामुळे पालक, विद्यार्थी आरटीईच्या प्रवेशप्रक्रियेकडे डोळे लावून बसले होते. मात्र, शिक्षण विभागाने आरटीई प्रवेशात केलेले बदल घटनाबाह्य असल्याचा निकाल उच्च न्यायालयाने दिला आहे. तसेच खासगी शाळांनी आधी दिलेले प्रवेश अबाधित ठेवून आरटीईअंतर्गत विद्यार्थ्यांना प्रवेश देण्याचा आदेश दिला आहे. त्यानुसार प्रवेशासाठी शिक्षण विभागाने काढलेल्या सोडतीनुसार प्रवेशपात्र विद्यार्थ्यांची निवडयादी जाहीर करून प्रवेशासाठी ३१ जुलैपर्यंतची मुदत दिली आहे.



न्यायालयाच्या आदेशानंतरही काही खासगी शाळांकडून आरटीई प्रवेश नाकारण्यात येत आहेत. प्रवेशक्षमता पूर्ण झाल्यामुळे वाढीव जागांसाठी सीबीएसईची परवानगी घ्यावी लागेल, त्यासाठी असलेली १५ जुलैची मुदत उलटून गेली आहे, परवानगी असल्याशिवाय विद्यार्थ्यांसाठी सुविधा आणि शिक्षकांची उपलब्धता करता येणार नाही, शाळेला पूर्वकल्पना न देताच शाळा आरटीई प्रवेशाच्या संकेतस्थळावर जोडण्यात आली अशी कारणे नमूद करत शाळांनी शिक्षण विभागाला निवेदन दिले आहे.

दरम्यान, खासगी शाळांकडून प्रवेशास नकार दिला जात असल्याने पालकांमध्ये भीती निर्माण झाली आहे. न्यायालयाने पालकांच्या बाजूने निकाल दिला असल्याने शिक्षण विभागाने या शाळांवर कारवाई करावी अन्यथा आंदोलन करावे लागेल, असा इशारा अखिल भारतीय समाजवादी अध्यापक सभेचे कार्याध्यक्ष डॉ. शरद जावडेकर यांनी दिला.

यंदा राज्यातील ९ हजार २१७ शाळांमध्ये १ लाख ५ हजार २४२ जागा प्रवेशासाठी उपलब्ध आहेत. त्यासाठी दाखल झालेल्या २ लाख ४२ हजार ५१६ अर्जांतून ९३ हजार ९ विद्यार्थ्यांना प्रवेश जाहीर झाला. प्रतीक्षा यादीत ७१ हजार २७६ विद्यार्थ्यांचा समावेश आहे. मंगळवारी सायंकाळपर्यंत ३० हजार ७७४ विद्यार्थ्यांनी प्रवेश निश्चित केला आहे. प्रवेशासाठी आज (३१ जुलै) शेवटचा दिवस आहे. प्रवेश मंदगतीने होत असल्याचे दिसून येत आहे.

"उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार प्रवेशप्रक्रिया राबवण्यात येत आहे. त्यामुळे खासगी शाळांनी आरटीईअंतर्गत २५ टक्के जागांवर प्रवेश देणे बंधनकारक आहे. वाढीव जागांना राज्य शासनाकडून मान्यता दिली जाणार आहे. तसेच सीबीएसईलाही त्याबाबत कळवण्यात येईल.

- शरद गोसावी, प्राथमिक शिक्षण संचालक.